OK
put in Agenda.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖

क्रमांक:मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार/५१९३४/२०२२ दिनांक: /११/२०२२
११/१२/२०२३

प्रति,
मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,
३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रा मजला,
ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्ड ईस्टेट,
फोर्ट, मुंबई-४००००१.

विषय:- **Mangroves Destroyed and road made, tide water blocked.**
**(तक्रार क्रमांक १४३)**

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 300
दिनांक 13/12/2023
प्रशासकीय अधिकारी
उप वनसंरक्षक

संदर्भ:- १)आपलेकडील पत्र जा.क्र.ल.ले./समिती/८०/सन २०२२-२३ दिनांक २२/०७/२०२२.
२) या कार्यालयाकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार/४६८३०/२०२२ दिनांक ०८/०९/२०२२

Mangrove Cmm

उपरोक्त विषयान्वये अर्जदार श्री. स्टॅलिन डी यांचा दिनांक ०८/०२/२०२१ चा तक्रार अर्ज संदर्भिय क्र.०१ कडील पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाला असून, अर्जदार यांनी उक्त अर्जान्वये मौजे तळोजा फाटा जवळ, ता. पनवेल, जि. रायगड या ठिकाणी खारफुटी नष्ट करुन रस्ता बनविल्याने समुद्राचे पाणी अडविलेबाबत तक्रार दाखल केली आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी दिनांक १२/०८/२०२२ रोजी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने संदर्भिय क्र.०२ कडील पत्रान्वये आपले कार्यालयाकडे अहवाल सादर करण्यात आला आहे.

परंतु, मा.अध्यक्ष, कोकण कांदळवन/पाणथळ तक्रार निवारण समिती तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२/०९/२०२३ रोजी झालेल्या कांदळवन तक्रार निवारण समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी महोदय यांनी प्रस्तुत तक्रारीमध्ये फेर चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने तक्रारदार, संबंधित तहसिलदार, संबंधित प्राधिकरणाचे प्रतिनिधी (सिडको/महानगरपालिका/नगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था), परिक्षेत्र वन अधिकारी यांचेसह संयुक्त स्थळपाहणी करुन, संयुक्त पंचनामा तसेच संबंधित जागेचे अक्षांश व रेखाशं यासह Geo Tagged छायाचित्रासह स्वयंस्पष्ट अहवाल आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी, पनवेल यांना या कार्यालयाकडील पत्र दिनांक १५/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यांत आले आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी त्यांचेकडील दि. ०७/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये खालील नमुन्यात अहवाल सादर केलेला आहे.

**कांदळवन/पाणथळ तक्रारीचा पुर्तता अहवाल**

| अ.क्र. | तक्रारीचा तपशिल | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १. | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री. स्टॅलिन डी यांचेकडील दिनांक ०८/०२/२०२१ रोजीचा ईमेलव्दारे तक्रार अर्ज. |
| २. | तक्रारीचा विषय | मौजे तळोजा फाटा जवळ, ता. पनवेल, जि. रायगड या ठिकाणी खारफुटी नष्ट करुन रस्ता बनविल्याने समुद्राचे पाणी अडविलेबाबत |

| | | |
|---|---|---|
| ३. | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा.स.नं.गावाचे नांव, तालुका | मौजे तळोजा फाटा जवळ, ता. पनवेल, जि. रायगड |
| ४. | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | १) श्रीम.आरती रेवसकर, मंडळ अधिकारी, कळंबोली<br>२) श्री.संकेत पाखले, सहा.कार्यकारी अभियंता, सिडको<br>३) श्री.एस.आर.पवार, वनरक्षक, कांदळवन कक्ष अलिबाग<br>४) स्टॅलिन डी. तक्रारदार |
| ५. | चौकशीमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती | तक्रारदार यांनी समक्ष सांगितल्यानुसार प्रत्यक्ष स्थळी उत्खनन पुर्णपणे बंद असून कांदळनाचे पाणी वाहून जाण्यासाठी पाईप टाकण्यात यावे असे तक्रारदार यांनी सांगितले.<br>कांदळवनाचा ऱ्हास झालेबाबत प्रत्यक्ष स्थळपाहणीच्या वेळी दिसून आले नाही. |
| ६. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | अशी बाब दिसून आलेली नाही. |
| ७. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | अशी परिस्थिती उद्‌भवलेली नाही. |
| ८. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता | अशी बाब नाही. |
| ९. | कोणत्या कायद्या अंतर्गत/कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | अशी बाब नाही. |

उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील चौकशी अहवालाची त्यासोबतची कागदपत्रे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

(डॉ.योगेश म्हसे)
जिल्हाधिकारी रायगड